## ऋण निर्देश

प्रस्तुत शोध प्रबंध सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. प्रस्तुत शोध प्रबंधासाठी डॉ. एम.एस. सोनार, विभाग प्रमुख शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यानी अत्यंत आपुलकीने आणि आत्मीयतेने कामाच्या व्यापातून वेळ काढून सतत मार्गदर्शन केले, प्रोत्साहन दिले याबद्दल डॉ. सोनार सरांचा मी अत्यंत ऋणी आहे.

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या कामात शिक्षण महाविद्यालय कराडचे प्राचार्य व्ही. एम. कोळी, महिला शिक्षण महाविद्यालय तासगांवचे प्राचार्य डी.डी. देसाई, कमला नेहरु ज्युनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन कराडचे मित्रवर्य प्राचार्य गजेंद्र ऐनापुरे, आदर्श विद्यामंदिर विंगचे मुख्याध्यापक, जगन्नाथ कोरडे, उपमुख्याध्यापक शिंदे व त्यांचा अध्यापक अध्यापकेतर स्टाफ, वाल्मिकी विद्यामंदीर तळमावलेचे मुख्याध्यापक एस.के. कुंभार व त्यांचा अध्यापक अध्यापकेत्तर स्टाफ संत घाडगेनाथ हायस्कूल कोळेचे मुख्याध्यापक जे.बी. कुंभार, उपमुख्याध्यापक हरदास व त्यांचा अध्यापक अध्यापकेत्तर स्टाफ तसेच माझे सहकारी प्राध्यापक बंधू भगिनीनी संशोधन कामास प्रोत्साहन दिले त्याबद्दल या सर्वांचा मी आभारी आहे.

प्रस्तुत संशोधनाची साधन सामुग्री गोळा करण्यासाठी कराड नगरपालिका हद्दीतील टिळक हायस्कूल, कन्या शाळा, यशवंत हायस्कूल श्री. शिवाजी विद्यालय, विठामाता विद्यालय, श्री संत तुकाराम हायस्कूल, महाराष्ट्र हायस्कूल या सातही माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक उपमुख्याध्यापक, सुपरवायझर्स, सहभागी इतिहास विषयाचे अध्यापक, अन्य विषयाचे अध्यापक, सहभागी विद्यार्थी विद्यार्थिनी, सहभागी पालक -

यासर्वांनी जो उत्साहाने प्रतिसाद दिला. याबद्दल मी या सर्वांचा आभारी आहे.

माझ्या संशोधन कार्यातील सिंहाचा वाटा प्रा. माधवी बोरगे हिचा, तर खारीचा वाटा मंगेश, मनिषा, मयूर या मुलांचा आहे. प्रेमळ वृध्द आईचा आशिर्वादही आहे. यापेक्षाही गेली वीस वर्षे माता पित्याची माया देवून सक्रीय प्रोत्साहन देणाऱ्या साहेब शांताचा व कुटुंबातील सर्व छोटया मोठयांचा मी कृतज्ञ आहे. याहूनही "ज्या कोणी" माझ्या संशोधन कार्यास अव्यक्त असे सुयश चिंतीले असेल त्यासर्व ज्ञात अज्ञातांचा मी ऋणी आहे.

कंटाळा न करता सुबक टंकलेखक करुन देणारा माझा मित्र पी. जी. कोरडे व ज्यांच्या सहकार्याने हे संशोधन कार्य पार पडले त्या पी. सी. पाटील, डॉ. रमेश जाधव आणि प्रा. नलवडे यांचा मी फार फार आभारी आहे.

या शोध प्रबंधाचा माध्यमिक शाळेतील इतिहासाच्या अध्ययन-अध्यापनातील पाठ्यपुस्तक व मार्गदर्शिकाच्या उपयोगाबाबत चांगला उपयोग होईल असा विश्वास वाटतो.

[ बाळकृष्ण मारुती बोरगे ]

स्थळ : कोल्हापूर.
दिनांक : २१-५-९०